अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# माजी महालेखापालांमुळेच काँग्रेस अडचणीत आली

अलीकडच्या काळात बरेच शासकीय अधिकारी निवृत्तीनंतर पुस्तक लिहून आपल्या कारकिर्दीच्या लेखाजोखा मांडतात. अर्थात अशा अधिकाऱ्यांचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी प्रामुख्याने राज्य किंवा केंद्र सरकारमध्ये महत्त्वाच्या पदावर राहिलेले, ज्यांची कारकिर्द काही ना काही कारणांमुळे गाजली. जे आपल्या शिस्तशीर, कायदेशीर, वागण्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या नाराजीचे कारण ठरले. या ना त्या कारणांमुळे चर्चेत राहिलेल्या किंवा वादग्रस्त ठरलेल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी निवृत्तीनंतर आपले अनुभव शब्दबध्द करण्याचा मार्ग निवडला. अशांच्या यादीतले ताजे नाव म्हणजे माजी केंद्रीय महालेखापाला विनोद राय यांचे आहे. मनमोहन सिंग यांच्या काळात म्हणजेच यूपीए दोनच्या कारभारातले अनेक गैरप्रकार राय यांनी बाहेर काढले. टू जी स्पेक्ट्रम घोटाळा, कोळसा खाण घोटाळा, खाजगी तेल कंपन्यांना दिलेल्या नियमबाह्य सवलती शस्त्रास्त्र खरेदीतील नियमबाह्यता अशा अनेक प्रकरणात त्यांनी कठोरपणे हिशेब तपासणी केली. आणि आपल्या अहवालात सरकारचा लाखो कोटी रुपयांचा महसूल कसा बुडाला हे उदाहरणासकट आकडेवारीनिशी सिध्द केले. राय यांनी केवळ सरकारी हिशेब तपासनीस किंवा लेखापाल अशी भूमिका न घेता आपण सरकारी व्यवस्थेचे एक विश्वस्त आहोत असा पवित्रा घेऊन सत्ताधाऱ्यांनी जाणीवपूर्वक या गैरव्यवहाराकडे कानाडोळा केला. दुर्लक्ष केले. सरकारला आपले नुकसान होत आहे, हे माहीत असूनही त्या गैरव्यवहाराला अभय दिल्याची अप्रत्यक्ष टीका राय यांनी आपल्या अहवालातून दिली होती. स्वातंत्र्यानंतर विनोद राय हे एकमेव महालेखापाल असावेत की, ज्यांनी सरकारला जाब विचारण्याचे धाडस केले. ते पहिलेच महालेखापाल असावेत की, ज्यांच्या अहवालामुळे देशाच्या एक लाख कोटींचा महसूल वाचू शकला किंवा कोळसा खाण हक्क वाटपातून बुडालेल्या महसुलाचाही शोध लागू शकला. या सगळ्या गैरव्यवहारावर पंतप्रधान म्हणून मनमोहन सिंग आवर आणू शकले असते. परंतु त्यांनी कोणतीही ठोस भूमिका न घेतल्याने या गैरव्यवहारांना मोकळे रान मिळाले असाच आशय सांगणारा निष्कर्ष राय यांनी आपल्या अहवालातून दिला. खरे सांगायचे तर महालेखापाल या स्वायत्त संस्थेची किंवा यंत्रणेची ताकद केवढी मोठी आहे, हे स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच सरकार आणि जनतेलाही समजले. या यंत्रणेची केवळ ताकदच नव्हे तर जबाबदारीसुध्दा किती मोठी आहे, याचीसुध्दा जनतेला पहिल्यांदाच जाणीव झाली.

### ती नावे बाहेर यावीत

केंद्र सरकार आपल्या अंदाजपत्रकात दरवर्षी करोडो अब्जावधी रुपयांची तरतूद करते.तेवढा पैसाही खर्च करते. परंतु जनतेचा कररुपाने गोळा झालेला हा पैसा योग्य पध्दतीने खर्च होतो की नाही, याची तपासणी करण्यासाठी ही महालेखापाल नावाची स्वतंत्र म्हणजे सत्ताधाऱ्यांचा हस्तक्षेप किंवा दबाव झुगारणारी यंत्रणा निर्माण केली गेली. आतापर्यंतच्या महालेखापालांनी अनेक अहवाल दिले. ते संसदेच्या पटलावर ठेवलेही गेले. परंतु त्यांची इतकी चर्चा झाली नाही. सरकारचे अकाऊंटंट सरकारचे वाभाडे काढू शकत नाहीत आणि काढले तरी ते दाबले जातात.असाच लोकांचा समज होता. सत्ताधाऱ्यांनासुध्दा महालेखापाल सरकारी हिशेब तपासनीस आहेत. त्यांचा अहवाल दाबणे फारसे कठीण नाही. परंतु राय यांनी आपल्या अहवालात या समजुतीला चांगलाच तडाखा दिला आणि म्हणून ते वादग्रस्त ठरले किंवा सत्ताधाऱ्यांनी तसे त्यांना हेतूतः ठरवले. हेच विनोद राय आता पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत, त्यांनी आपल्या सेवाकाळातल्या अनुभवांवर आधारित एक पुस्तक लिहिले आहे. पुढच्या महिन्यात त्याचे प्रकाशन होईल. परंतु त्यापूर्वी त्यांनी काही विधाने केली. ज्यावेळी आपण अहवाल सादर केले त्यातून राजकीय नेत्यांची नावे वगळण्यासाठी आपल्यावर दबाव आणला गेला असे त्यांनी म्हटले. त्यांच्या या ताज्या विधानाने काँग्रेस पक्षात पुन्हा एकदा अस्वस्थता पसरली आहे.कारण राय यांनी तो दबाव झुगारला. महालेखापालांवरच दबाव आणला जातो. म्हणजे त्या सगळ्या यंत्रणेला खिशात घालण्याचा यूपीए सरकारचा इरादा होता हे स्पष्ट होते. आता हा दबाव नेमका कोणी आणला. हे सांगण्याची तयारी राय यांनी दाखवली पाहिजे, शिवाय त्यांची नावे वगळण्यासाठी दबाव आणला गेला ती नावे तरी कोणती होती हेसुध्दा स्पष्ट व्हायला हवे.कारण वादाला तोंड फोडल्यानंतर तो अधर्वट राहण्यात काही अर्थ नाही. त्यातून राय यांच्या हेतूवरच शंका घेतली जाऊ शकते. निवृत्तीनंतर पुस्तक लिहिण्याचा आणि गुलदस्त्यातल्या काही बाबी जाहीर करण्याचा त्यांचा प्रयत्न चांगलाच ठरतो. परंतु आपल्या आगामी पुस्तकाच्या प्रसिध्दीसाठी त्यांनी हा प्रकार केलेला नाही, हे लोकांना कळले पाहिजे. ही गोष्ट जितकी खरी की त्यांनी सरकारच्या दबावाला झुगारले आणि आपली जबाबदारी पार पाडली. सेवेत असताना त्यांनी दबाव टाकणाऱ्यांची नावे का जाहीर केली नाहीत, असा प्रश्न आता निर्माण होऊ शकतो.त्याला राय यांच्याकडे समाधानकारक उत्तर असणे गरजेचे आहे.

### स्वत:चे नुकसान टाळण्याचा प्रयत्न

साधारणपणे निवृत्तीकडे वाटचाल करणारे सरकारी अधिकारी जाता जाता आपले नुकसान होणार नाही याची काळजी घेतात.आणि मग त्यांच्या कारकिर्दीत त्यांच्या मनाला न पटलेल्या गोष्टी ते नंतर पुस्तक रुपाने प्रसिध्द करतात. यामध्ये आतापर्यंत अनेक माजी लष्करप्रमुख, नौदलप्रमुख, अनेक कॅबिनेट सेक्रेटरी, सीबीआयमध्ये संचालक म्हणून काम केलेले अधिकारी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती, एवढेच नव्हे तर गुप्तचर संस्थेतून निवृत्त झालेले अधिकारीही पुस्तके लिहून आपण कसे प्रामाणिकपणे काम केले हे सांगण्याचा प्रयत्न करतात. कारण सेवेत असताना त्यांच्यावर निश्चितच काही बंधने असतात. सरकारच्या रोषाला सामोरे जाण्याइतपत आणि सेवेच्या अगदी शेवटच्या टप्प्यात आपले निवृत्तीवेतन किंवा प्रमोशन याबाबत त्यांना आर्थिक नुकसानही करून घ्यायचे नसते. तोच प्रकार थोड्याफार फरकाने राय यांनी केला.तरीदेखील अन्य अधिकाऱ्यांच्या तुलनेत विनोद राय यांनी दाखवलेले नैतिक धैर्य अधिक मोलाचे ठरते.अधिक महत्त्वाचे ठरते.त्यांनी ज्या कोळसा खाणींच्या मुद्दावर प्रश्नचिन्ह निर्माण केले होते त्याच्यावरच आता सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले. त्यावरून राय यांच्या भूमिकेची कल्पना येते.